# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 20 May 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक – २० मे २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- भारत-इटली द्विपक्षीय संबंधांसाठी संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा एक व्यावहारिक चौकट प्रदान करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणुकीस अमेरिकेतले उद्योग अनुकूल- मुख्यमंत्र्यांची माहिती
- जनगणनेतली जातगणना रद्द करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली
- औषध विक्रेता संघटनेच्या बंदला विभागात उत्स्फुर्त प्रतिसाद

आणि

- छत्रपती संभाजीनगर झेडपी शाळांमधल्या अतिरिक्त वर्गखोल्यांत अंगणवाड्या भरवण्याचे आदेश

****

भारत-इटली द्विपक्षीय संबंधांसाठी संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा एक व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट प्रदान करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज इटलीत रोम इथे, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केल्यानंतर संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत-इटली नवोन्मेष केंद्र स्थापन करण्यावर काम सुरू असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत-इटली संरक्षण औद्योगिक कृती आराखड्यामुळे लष्करी सामग्रीच्या सह-विकासाला आणि सह-उत्पादनाला मार्ग मोकळा झाला आहे. जलवाहतूक, बंदरांचे आधुनिकीकरण, लॉजिस्टिक्स आणि सागरी अर्थव्यवस्था या क्षेत्रांमध्येही दोन्ही देश एकत्र काम करतील, असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं.

मेलोनी यांनी यावेळी बोलतांना, दोन्ही देशांमधील मैत्री, आदर आणि परस्पर विश्वासावर आधारित असल्याचं सांगितलं.

दरम्यान, पंतप्रधानांच्या या परदेश दौऱ्यात विविध देशांसोबत केलेल्या धोरणात्मक करारांमुळे भारताचं पुढील सुमारे दोन दशकांचं भवितव्य सुरक्षित झाल्याचं मत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

दरम्यान, भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी अणुऊर्जा महत्त्वाची ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. केवळ सौर आणि पवन उर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्यास अनुकूल असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले….

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

राज्यात डिजिटल जनजागृती आणि सुरक्षित मोबिलिटीसाठी रॅपिडो आणि महाराष्ट्र माहिती आणि तंत्रज्ञान महामंडळ लिमिटेड–महाआयटीयांच्यामध्ये आज सामंजस्य करार करण्यात आला. या कराराद्वारे राज्यातील नागरिकांपर्यंत शासनाच्या डिजिटल सेवांची माहिती पोहोचवणं, आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत जनजागृती वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

****

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नसून गरजेच्या प्रमाणात इंधनसाठा उपलब्ध असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून गरजेपेक्षा जास्त इंधन भरण्याचा प्रयत्न केल्यास पुरवठा साखळी विस्कळीत होते, असं सांगत, इंधनाचा काटकसरीने वापर करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

****

अल्पसंख्यांकांचं सशक्तीकरण देशाच्या विकासासाठी आवश्यक असल्याचं मत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी व्यक्त केलं. ते आज नागपुरात माध्यमांशी बोलत होते. अल्पसंख्यांक समाजातल्या सर्वधर्मीय

नागरिकांसाठीच्या विविध योजनांची जिल्हाधिकाऱ्यांनी प्रभावी अंमलबजावणी प्रामाणिकपणे करावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

आगामी जनगणनेदरम्यान जातगणना करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली. सरकारला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मागासवर्गीय लोकसंख्या नेमकी माहीत असणं गरजेचं आहे, असं मत प्रदर्शित करत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील पीठानं सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला.

****

सरकारी विधीतज्ज्ञ मंडळं आणि विधी अधिकारी पदांवरील नियुक्तींमध्ये महिला वकिलांना ३० टक्के आरक्षणाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, सर्व राज्य सरकारं तसंच केंद्रशासित प्रदेशांकडून प्रतिसाद मागवला आहे. एका विश्वस्त मंडळाने दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने नोटीस बजावली आहे.

****

यूएलपीजीएम-व्ही-तीन क्षेपणास्त्राच्या यशस्वी विकास चाचण्या केल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संस्था डीआरडीओ, संरक्षण सह-उत्पादन भागीदार आणि उद्योगांचं कौतुक केलं आहे. संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं एक महत्वाचं पाऊल असल्याचं संरक्षण मंत्र्यांनी म्हटलं आहे.

****

वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एफडीएचे आयुक्त श्रीधर दुबे यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ज्या जिल्हा परिषद शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्या उपलब्ध आहेत, तिथे आता अंगणवाड्या भरवण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. आगामी शैक्षणिक वर्ष २०२६ – २७ पासूनच या

निर्णयाची थेट अंमलबजावणी केली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रकद्वारे ही माहिती दिली आहे. पूर्व-प्राथमिक शिक्षणाला शालेय रचनेशी जोडणं यामुळे सोपं होणार आहे. या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करून त्याचा अहवाल शिक्षण संचालनालयास सादर करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत.

****

खते आणि बियाण्यांची साठेबाजी, लिंकिंग किंवा वाढीव दराने विक्री सारखे गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाईचा इशारा छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिला आहे. 'अल निनो' च्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. यंदा खरीप हंगामादरम्यान प्रतिकूल परिणामांची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी योग्य उपाययोजना कराव्यात असं आयुक्तांनी सूचित केलं. संभाव्य आव्हानांना तोंड देण्यासाठी कृषी विभाग सज्ज असून, शेतकऱ्यांनीही योग्य नियोजनाचा अवलंब करावा, असं आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केलं आहे.

****

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज खरीप हंगामपूर्व आढावा बैठक घेतली. या हंगामासाठी प्रशासनाने चोख नियोजन तसंच गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

****

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या बंदला आज विभागातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चार हजार औषधविक्रेत्यांनी बंदमध्ये सहभाग घेतला.

दरम्यान, या बंदच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक सेवेसाठी औषधी भवन इथं कृतीदल कार्यरत करण्यात आलं, अतिआवश्यक औषधी या कृतीदलाने तत्काळ उपलब्ध करून दिली. शहरातील औषध दुकानं बंद असल्याने, घाटी रुग्णालयातील औषध केंद्रावर नागरिकांची गर्दी उसळली होती.

हिंगोली जिल्ह्यातील १ हजार २६० औषध विक्रेते बंद मध्ये सहभागी झाले. आंदोलकर्त्यांनी सरकारच्या विरोधात घोषणा देत जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचं निवेदन सादर केलं.

बीड जिल्ह्यात गेवराई केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने औषधी विक्रेता संघटनेच्या या बंदला पाठिंबा देत, शहरात मूकमोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये तालुक्यातील औषध विक्रेते, मेडिकल चालक तसंच संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

परभणी जिल्ह्यात औषध विक्रेत्यांनी संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण शहरात औषधी दुकाने दिवसभर पूर्णतः बंद असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

धुळे, सोलापूर, रत्नागिरी, यवतमाळ जिल्ह्यातही या बंदला प्रतिसाद मिळाला.

****

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी गेल्या १८ मे पासून लागू झालेल्या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याचं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं आहे. त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते.

****

बीड पोलिस दलात चार अत्याधुनिक एआय सर्व्हेलन्स व्हॅन दाखल झाल्या असून पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या वाहनांना हिरवा झेंडा दाखवला. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात जिल्हा सुरक्षित ठेवण्यासाठी हे तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास काँवत यांनी यावेळी व्यक्त केला.

****

राज्यात आज अमरावती इथं सर्वाधिक ४६ पूर्णांक आठ दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात परभणी ४४ पूर्णांक दोन, छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक सात तर धाराशिव इथं ४१ अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

विदर्भात पुढचे दोन दिवस वर्धा, अमरावती आणि अकोल्यात उष्णतेचा रेड अलर्ट तर नागपूर, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यात लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना आज उष्णतेचा यलो अलर्ट आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स संघात सामना होणार आहे. कोलकाता इथं ईडन गार्डन्स मैदानावर सायंकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होणार आहे.

✻✻✻✻